महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १३५ वा | दिनांक : २०/०२/२०२५ | वार : गुरूवार

## धनंजय मुंडेंची मंत्री होण्याची पात्रताच नाही अंजली दमानिया यांचा आरोप



**मुंबई** : मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर अपेक्षित कारवाई केली जात नाही, अशी तक्रार सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे. पत्रकार परिषद घेत अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. तसेच त्यांनी कसे घोटाळे केले आहेत यावर पुन्हा एकदा हल्लाबोल केला आहे. धनंजय मुंडे यांची मंत्रिपदावर बसण्याची देखील लायकी नसल्याचे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.

धनंजय मुंडे हे मंत्रिमंडळातून बाहेर पडत नाहीत तोपर्यंत या हत्येच्या शोधाला दिशा मिळणार नाही. मी सुरुवातीला कराड आणि मुंडे यांचा कसा संबंध आहे हे मी दाखवले. कराड आणि धनंजय मुंडे हे कंपन्यांमध्ये एकत्र कसे आहेत ते मी दाखवले, त्यांचे आर्थिक व्यवहार असो, मिळालेला नफा असो, दहशत असो मग ऑफिस ऑफ प्रॉफिटमध्ये मी दाखवले राज्याच्या मंत्र्याला राज्याच्या कंपनीकडून थेट नफा मिळत आहे. बॅलन्स शिटच्या बॅलन्स शिट भरले जात आहेत. त्यानंतर मी कृषी घोटाळा बाहेर काढला, असे अंजली दमानिया म्हणाल्या.

पुढे बोलताना अंजली दमानिया म्हणाल्या, कृषी घोटाळ्यात मी दाखवले की 80-90 रुपयांचे नॅनो युरियाला 220 रुपयांनी खरेदी केली गेली. या सगळ्या गोष्टींचे डीटेल्स दिले. त्यानंतर मी या नॅनो युरिया आणि नॅनो डीएपीच्या बॉटल मागवल्या देखील आणि त्याचा इनव्हॉईस मी ट्विट केला. तर त्याचा जर आपण क्रम पहिला तर 4 तारखेला मी पत्रकार परिषद घेतली होती आणि 5 तारखेला मी या बॉटल मागवल्या आणि त्यानंतर 7 तारखेला कंपनीकडून बंदी घालण्यात आली आणि असे सांगण्यात आले आहे की कुठल्याही ऑनलाईन कंपन्या इफकोचे प्रॉडक्ट विकू शकत नाही. धनजय मुंडे यांचे पीए जोशी म्हणून आहेत कोणीतरी त्यांनी सगळ्या माध्यमांना पाठवून दिले की इफकोचे प्रॉडक्ट विकता येत नाही असे जाहीर केले. मात्र अनेक वेबसाइटवरून प्रॉडक्ट विकले जातात.

इफकोचे घोटाळे अनेकवेळा झाले आहेत. तसेच एक सीबीआयचा एफआयआर देखील आहे. किती मोठ्या प्रमाणात इफकोमध्ये भ्रष्टाचार होतात, तेथील अधिकारी कशा प्रकारे भ्रष्टाचार करतात याचे डेटेल्स मी दिले आहेत. धनंजय मुंडे तर काय काय करतात यावर मला आता बोलावे वाटत नाही.

कृषी घोटाळा नंबर 2 मध्ये धनंजय मुंडे कुठल्याही पद्धतीने वाचत नाहीत. हे एक पत्र आहे या पत्रावर तारीख नाही. मंत्री लिहितात पण तारीख लिहिलेली नाही. या पत्रात लिहिले आहे की दिनांक 30 सप्टेंबर 2024 रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत दिनांक 23 सप्टेंबर 2024 रोजी झालेल्या बैठकीत विचारात ठेवलेल्या मंजूर झालेला कृषी विभागाच्या प्रस्तावचे इतिवृत्त कायम करण्यात आले. म्हणजे हा मंत्री किती थराला जाऊ शकतो, याचे हे धडधडीत उदाहरण आहे. मी या दोन्ही तारखांच्या बैठकांचे अटॅचमेंट पाठवले आहेत. कुठेही निर्णय झालेला नाही आणि मंत्री लिहितात काय. महाराष्ट्र शासन कार्य नियमावली व त्या अन्वये दिलेल्या अनुदेशनमधील तरतुदीनुसार मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने त्वरित कारवाई करावी, मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याप्रमाणे तातडीने, आता मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेलाच नाहीये. किती खोटे आहे हे.

पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांचे उत्पादित, एकतर हे काही उत्पादित करत नाहीत. त्यांनी एक टेक्नॉलजी डेवलप केली होती आणि ती टेक्नॉलजी त्यांनी ट्रान्सफर केली होती. पंजाबराव देशमुख विद्यापीठाला त्याची रॉयल्टी आहे, बाकी काही नाही. पण हे काय लिहितात, पेटंटेड सोलार लाईट पंप या बाबीचा लाभार्थी पुरवठा करण्यासाठी शासननिर्णय निर्गमित करून प्रक्रिया सुरू करावी आणि तसे पैसे एमईआरडीसी आणि पीडीकेव्ही अकोला यांना निर्देशित करून निधी वर्ग करण्यात यावा असे हे लिहितात. आणि शेतकऱ्यांना लाभापासून वंचित राहू नये म्हणून यांची कारवाई तातडीने म्हणजे आजच करा, असे हे लिहितात.

18 ऑक्टोबरला जीआर काढण्यात आला त्यात त्यांनी दोन गोष्टी केल्या एक म्हणजे अतिरिक्त 500 कोटी देण्यात यावे आणि हे जे 200 कोटी होते जे मी जेव्हा घोटाळा काढला होता तेव्हा मी म्हटले होते की 200 कोटीचे बॅटरी, पंप आणि सोलार लाईट घेतले होते, ते वेगळे असे हे दोन्ही सॅन्क्शन या जीआरमधून करण्यात आले होते. पण हे कधी नव्हतेच. दोन्ही कॅबिनेट बैठकी बघा, त्यात बॅटरीबद्दल एक शब्दही बोलण्यात आला नाही.

## शरद पवारांचा एकमेव आमदार अजित पवारांच्या सोबत



**पुणे** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवनेरी किल्ल्यावर शिवजयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार उपस्थित होते. याच सोबत इतरही अनेक आमदार, मंत्री व नेते उपस्थित होते. मात्र, यात विशेष म्हणजे मंचावर अजित पवारांच्या मागे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार बापू पठारे हे देखील होते. त्यामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे.

शरद पवार गटातील वडगाव शेरीचे बापू पठारे हे एकमेव आमदार आहेत. शिवनेरी किल्ल्यावर शासकीय कार्यक्रमात अजित पवार यांच्या मागे बापू पठारे बसले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंचावरून उपस्थितांशी संवाद साधला त्यावेळी आमदार बापू पठारे यांच्या नावाचा देखील उल्लेख केल्याचे दिसून आले, त्यामुळे आता राजकीय वर्तुळात अजित पवार शरद पवारांना धक्का देण्याच्या तयारीत आहेत का अशा चर्चा रंगल्या आहेत.

शिवजयंती निमित्त शिवनेरीवरील शासकीय कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत बापू पठारे दिसल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. बापू पठारे हे शरद पवार गटाचे एकमेव आमदार आहेत, पण आता ते शरद पवारांची साथ सोडणार का? असा सवाल उपस्थित झाला आहे. यावर स्पष्टीकरण देताना मतदारसंघातील कामानिमित्त भेट घेतल्याचे बापू पठारे यांनी सांगितले आहे.

दरम्यान, सध्या महाविकास आघाडीमधील परिस्थिती फारशी चांगली राहिलेली नसल्याचे दिसत आहे. ठाकरे गटाचे देखील अनेक नेते शिवसेना शिंदे गटात प्रवेश करत आहेत. रत्नागिरी येथील माजी आमदार राजन साळवी यांनी देखील उद्धव ठाकरे यांची साथ सोडली व एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत त्यांनी प्रवेश केला आहे. त्यामुळे आता शरद पवार गटाचे एकमेव आमदार बापू पठारे देखील शरद पवारांची साथ सोडणार का? असा सवाल उपस्थित झाला आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २० फेब्रुवारी २०२५

## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत शिवजयंती उत्सव साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा छत्रपती संभाजी नगर या शाळेत शिवजयंती आनंदात साजरी करण्यात आली यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री प्रभाकर पुंजाबा शिंदे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान स्वीकारले सूत्रसंचालन बेबी माळोदे यांनी केले आभार प्रदर्शन अर्चना भारद्वाज यांनी मानले यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या विषयी माहिती सांगितली व नृत्यही सादर केले कार्यक्रमाप्रसंगी सर्जेराव वाघ, वसंत राठोड,गणेश पठाडे,संग्राम सिंग राजपूत, मंगलतारो, विशाखा, अनुजा भिंगोले, सुनीता गणोरीकर, सुनिता साबळे, मनीषा शिंदे, सूर्यवंशी, जाहेद खान पठाण, संदीप चव्हाण, रवींद्र खाते व विद्यार्थी उपस्थित होते

## अजितदादा पवार महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन



**रामनगर :** अजितदादा पवार महाविद्यालय रामनगर सा.का.येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा डॉ. सुनील नजान हे होते. तर प्रा. रामेश्र वर गोडसे हे प्रमूख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कमलाकर रगडे हे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी श्री. संजय चव्हाण, श्री. धनंजय घुले, श्री. सचिन भुतेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. या वेळी मोठ्याप्रमाणावर राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

## दानकुँवर महिला महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक संध्येचे आयोजन

**जालना :** श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक संध्येचे आयोजन. येथील श्रीमती दानकुँवर महिला महाविद्यालयात आज (गुरुवार) सायं. ०४ वा. वार्षिक कला क्रीडा महोत्सव-२०२५ चा पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक संध्या चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.महेंद्रकुमारजी गुप्ता आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून महिको सीड्स प्रा.लि.जालना चे संचालक मा.श्री.रितेशजी मिश्रा हे असणार आहेत. विशेष उपस्थिती म्हणून श्रीमती दानकुँवर हिन्दी कन्या विद्यालय समिती,जालनाचे सर्व सन्माननीय व्यवस्थापन समिती सदस्य आहेत. सांस्कृतिक संध्येच्या पर्वामध्ये समूह नृत्य, सांगीतिक योगा, लावणी, एकल नृत्य, एकल गायन यासारख्या विविध कलाप्रकारांचे सादरीकरण होणार आहे. या कार्यक्रमासाठी शहरातील सर्व रसिक श्रोत्यांनी आमच्या विद्यार्थिनींना प्रोत्साहित करण्यासाठी व कार्यक्रमाचा आनंद घेण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. वासुदेव उगले व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.तळेकर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# छत्रपती शिवाजीराजे हे जाती धर्माच्या पलिकडील महापुरूष - मिर्झा नदवी.




**छत्रपती संभाजीनगर :** "आपल्या देशाचा इतिहास धर्मा धर्माच्या लढाईचा कधीच नव्हता व नाही कारण मुघलांकडे हजारो हिंदू सरदार होते तसेच ते छत्रपती शिवरायांकडेही अत्यंत विश्वासू हजारो मुस्लीम सैनिक प्रमुख सरदार होते .तो लढा स्वातंत्र्य व स्वराज्याचा होता . पारतंत्र्याच्या विरोधातील होता . त्याला जाती , धर्मात अडकवणे गैरच. छत्रपती शिवरायांचे विचार कार्य जाती धर्मापलीकडील होते. ते खरे महापुरुष होते" असे प्रतिपादन रिड अॅन्ड लिड फाउंडेशनचे मिर्झा अब्दुल कयुम नदवी यांनी व्यक्त केले .

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या शिवजयंती समारोहात प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना नदवी यांनी विविध ग्रंथातील संदर्भ देत धर्मनिरपेक्ष शिवराय व शिवराज्याचे , स्वराज्याचे दाखले दिले. गोविंद पानसरे यांनी शिवरायांचे विचार ,कार्य खऱ्या अर्थाने बहूजनात रूजवल्याचे सांगत शिवाजी महाराजांचा राज्याभिषेकांनंतर पहिला सत्कार गोवलकोंड्याच्या कुतुबुद्दीन शहानी केल्याचे स्पष्ट केले. मदारी मेहतर, सिद्दी हिलाल, नूर खान, दौलत खान, काझी हैदर यांचे कार्य स्वराज्यासाठीच होते हे विसरून चालणार नाही. आज आम्ही प्रत्येक महापुरूषास त्या त्या जातीत अडकवून टाकतो हे धोकादायक असल्याचे सांगत मानवतेसाठी कार्य करा .आम्ही शिवराय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार उद्धृन पुढे नेत असल्याचे त्यांनी नोंदवले. प्रारंभी डॉ. राजेंद्र शेलार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले .अध्यक्षीय समारोपात डॉ. व्ही. जी.पिंगळे यांनी बहुजनांचे राजे छत्रपती शिवराय विविध उदाहरणे देत अधोरेखित केले. मिर्झा नदवी यांच्या हस्ते अश्विनी खंडारे,मयुरी वाघ, संध्या हुंडे, ऋतुजा धनवटे संपादित संविधान साक्षरता या भित्तिपत्रकांचे विमोचन करण्यात आले.

यावेळी डॉ. आर.व्ही. मस्के, डॉ. एस.पी. खिल्लारे, डॉ. बी. एन. शिंदे, आयोजक डॉ. एस.पी. बुधवंत, प्रा. नवनाथ गोरे, प्रा. अंबादास कायंदे, डॉ. प्रज्ञा रूईकर साळवे, अधिक्षक राजू पट्टेकर, डॉ. गणेश खिल्लारे, डॉ. विजय आडे , डॉ..प्रेमराज वाघमारे, डॉ. अशोक केवटे, डॉ. वैजनाथ सुर्यवंशी , डॉ. उमेश मालपाणी यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सतीश वाघमारे यांनीतर आभार डॉ. संघरत्न गवई यांनी केले

## सलग तिसऱ्यांदा शिवजयंती साजरी करण्यासाठी हजारो शिवप्रेमी आग्रा येथे रवाना



**पडेगाव (शिवाजी गायकवाड):** अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठान 'च्या पुढाकाराणे होत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती याहिवर्षी मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी आग्रा येथील ऐतिहासिक किल्ल्यात हा भव्य सोहळा संपन्न होणार असून,अजिक्य देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा जयंती उत्सव साजरा होत आहे.शिवप्रेमीची सुरक्षा,,येण्या जाण्यासाठी, जेवण, पाणी नाश्ता, प्रवासाची मोफत व्यवस्था करण्यात आलेली आहे.रेल्वेत संजय कांजूने, अतिक मोतीवाला,अशोक मोरे,उद्धव पवार, रेखा वाहटूळे, तनुश्री गायकवाड, अमोल कर्डीले, प्रवीण जंगले, अण्णा जाधव,इतिहास संशोधक प्रा.शिवाजी गायकवाड आदिसह शिवप्रेमी नागरिक यांची मोठया संख्येने रेल्वेने रवाना झाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २० फेब्रुवारी २०२५


## जि प प्राथमीक शाळा रेल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात संपन्न



**रेल :** जि प प्राथमीक शाळा रेल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली यावेळी ग्रामपंचायत सरपंच धनसिंग भाऊ राठोड ग्रामपंचायत सदस्य ललित गायकवाड व रेलचे ग्रामसेवक अंकुश चव्हाण शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे शाळेचे सहशिक्षक विक्रम गदळे अरुण बोडखे जयराम नागे बाळू अण्णा थेटे चालली व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष सुशीला दिवेकर भाग्यश्री थेटे जानका थेटे अंगणवाडी सेविका थेटे ताई बोडखे ताई कुलकर्णी ताई रमाबाई आंबेडकर बचत गटाच्या महिला सदस्य व विद्यार्थी उपस्थित होते

## महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी शाळेत शिवजयंती साजरी




**छत्रपती संभाजीनगर :** बहुजन स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीदिनी महाराजांचे कार्य-कर्तृत्व स्मरण करून अद्वितीय महानायक- छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मनपा माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी या शाळेत साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थी शिक्षक मुख्याध्यापक यांची उपस्थिती होती.

## शिवाजी महाराजांची जयंती विविध कार्यक्रमांनी जल्लोषात साजरी



**मुरुम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** देशाला महापुरुषांच्या इतिहासाचा वसा आणि वारसा आहे. तो वारसा सर्वांनी जतन करून ठेवणे महत्त्वाचे आहे. तरुणांनी महापुरुषांची जयंती साजरी करून त्यांचे चरित्र वाचून विचार आत्मसात करावेत, असे प्रतिपादन भूगोल विभागाचे प्रा. डॉ. पुरुषोत्तम बारवकर यांनी केले.

मुरूम येथील माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी बुधवारी (ता. १९) रोजी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फार्मसी कॉलेजच्या समन्वयक प्रा. डॉ. रवींद्र आळंगे होते. यावेळी प्रा. डॉ. पुरुषोत्तम बारवकर, प्रा. डॉ. सुजित मटका, प्रा. अजिंक्य राठोड, महादेव पाटील, सुभाष पालापुरे, आनंद वाघमोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास डॉ. बारवकर यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. सुरज साठे यांनी शिवाजी महाराजांबद्दल घोषणाबाजी करून वातावरण निर्मिती केली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी फेटा, अंगरखा, धोतर, कमरपट्टा तर मुलींनी नऊवारी साडी, पारंपारिक दागिने असा मराठमोळ्या पोशाखात शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करणारे गीत गाऊन, हातात भगवे ध्वज घेऊन, लेझीमच्या साह्याने नृत्य सादर करून श्रोत्यांची मने जिंकली.

अध्यक्षीय समारोपात डॉ. आळंगे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे भान ठेवून योजना आखत व बेभान होऊन त्याचे अंमलबजावणी करीत असत. त्यामुळेच ते अनेक लढाया जिंकू शकले. राजमाता जिजाऊ साहेब व छत्रपती शिवाजी महाराज यांनी अंधश्रद्धा, भूत प्रेत, भानामती हे थोतांड असल्याचे मानत होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. सुदीप ढंगे, प्रा. पायल आगरकर, प्रा. वैष्णवी पाटील, प्रा. राजनंदिनी लिमये, प्रा. प्रियंका काजळे, प्रा. सदफअलमास मुजावर, प्रा. अनिल मोरे, प्रा. लखन पवार, मल्लू स्वामी, अमोल कटके, किशोर कारभारी आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राहुल इंजे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. विनंती बसवंतबागडे तर आभार प्रा. विवेकानंद चौधरी यांनी केले. यावेळी बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## भिमराय ते शिवराय सजीव देखाव्यासह भव्य दिव्य मिरवणुक काढुन शिवजयंती उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आंबेडकरवादी बहुजन विकास समिती व GPCS मित्र मंडळाच्या वतीने फुलेनगर एकनाथनगर उस्मानपुरा येथुन छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य घ्योड्यावर विराजमान महाराजांचा व मावळ्याचा सजीव देखावा सादर करीत डिजेच्या तालावर भगवे निळे झेंडे फेटे परीधान करुन भव्य अभिवादन रॅलीला हजारों युवक युवती व नागरीकांच्या उपस्थितीत सुरुवात करण्यात आली. यानंतर फुलेनगर येथिल पँथर मगनदादा निकाळजे यांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पन करण्यात आले.यावेळी पँथर मगनदादा निकाळजे सामाजिक प्रतिष्ठाण व त्रिरत्न मित्र मंडळाच्या वतीने मैत्री बुध्द विहार येथे उपस्थित नागरीकांना मोफत पाणी बोटलचे वाटप करण्यात आले.यानंतर एकनाथनगर येथुन फुलेनगर पिरबाजार येथिल विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पन करुण अभिवादन करण्यात आले यानंतर पिरबाजार येथुन उस्मानपुरा गोपाल्टी मार्गे क्रांतिचौक येथे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुख्य पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. मिरवणुक मार्गावर व्यापारी व विवीध मित्रमंडळ व सामाजिक संघटनांच्या वतिने या भव्य मिरवणुकिचे स्वागत केले.

यावेळी आंबेडकरवादी बहुजन विकास समितीचे अध्यक्ष दिपक निकाळजे, सागर मोटे पाटिल, प्रशिक आठवले,गणेश गव्हाणे, बुद्धभूषण निकाळजे, संकेत कुलकर्णी, शुभम गंगावणे,सौरभ दिवटे,अजय रगडे,यश पाटील,सुजल कथार, ज्ञानेश्वर श्रीखंडे, श्रीधर काथार,कृष्णा मुंढे, अजिंक्य कोंडके,तेजस राठोड,महेश पवार, अजय राऊत, सागर तायडे,अविनाश डोंगरे,अक्षय जाधव, हरीष कांचनकर, निखिल निकाळजे, साहील गायकवाड, गौरव सावंत, रोहन निकाळजे, राजेश सरसांडे सोहम तूपे व हजारोंच्या संख्येने युवक युवती व नागरीकांची उपस्थिती होती.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103

E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल
कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.